२१ / ११ / ३१४ चिन्ता ८२४५०४ / Fimmgd 
स्प/२८१७
135

# एकोणतीस वर्षे मुदतीचा भाडेपट्टा

मुद्रांक शुल्क ११,०००/– दिनांक :– १०/०२/२०२२

नोंदणी तुकडी गडचिरोली व पोटतुकडी आरमोरी

जिल्हा परिषद गडचिरोली, प.स. व तहसिल आरमोरी अंतर्गत

ग्रामपंचायत मौजा शिवणी बु. येथील

विभाग क्र. ४ कोड नं. ५३ ग्रामिण क्षेत्र

भाडेपट्टा लिहुन घेणार :– ग्रीनगोंडवाना शेतकरी उत्पादक कंपनी लिमी. शिवणी बु.
ता. आरमोरी जि. गडचिरोली तर्फे अधिकृत संचालक,
प्रशांत नामदेव दर्वे वय २३ वर्षे धंदा शेती
रा.पो. शिवणी बु. ता. आरमोरी जि. गडचिरोली
मो.नं. ७७७४९८१५३८ पिन कोड नं. ४४१२०८
आधार क्र. ५२४६ ३५०० १६०७ यांना

भाडेपट्टा लिहुन देणार :– राजेंद्र दादाजी खोब्रागडे वय ५२ वर्षे धंदा शेती
रा.पो. शिवणी बु. ता. आरमोरी जि. गडचिरोली
मो.नं. ९९२१४२४९३८ पिन कोड नं. ४४१२०८
आधार क्र. २३४२ ०३५० ५४००

मी आज दिनांक १०/०२/२०२२ इसवी रोजी २९ वर्षे मुद्दतीचा भाडेपट्टा लेख लिहुन देतो की, माझे मालकीचे माझे नावे पटवारी रेकार्डला नोंद असुन प्रत्यक्ष माझ्या कब्जा वहिवाटीत असलेली शेतजमिन खालील प्रमाणे आहे.

मौजा:– शिवणी बु. प.हं.नं. ०५ रा.नि.म. व ता. आरमोरी जि. गडचिरोली येथे

| भुमापण क्र. | हे.आर. | जमा | हक्क |
|---|---|---|---|
| २८६ | १.७३ | ४.४५ | क.न. १ विहिर |

यापैकी ०.२० हे.आर. शेतजमिन

चर्तुसिमा:–
पुर्वेस :– माझी याच नंबर पैकी उर्वरित शेती.
पश्चिमेस :– आरमोरी – शिवणी बु. मुख्य रस्ता.
उत्तरेस :– किरण लांडेकर यांची शेती.
दक्षिणेस :– भारत राऊत यांची शेती.

या प्रमाणे प्रत्यक्ष मौक्यावर असलेली शेती मी ग्रीनगोंडवाना शेतकरी उत्पादक कंपनी लिमी. शिवणी बु. ता. आरमोरी जि. गडचिरोली यांना सदर भाडेपट्टा करारनामा प्रतिवर्ष ५००/– ( पाचशे रू.) प्रमाणे दिनांक ०४/०२/२०२२ पासुन दिनांक ०३/०२/२०५१ या २९ ( एकोणतीस वर्षाच्या ) कालावधीकरीता भाड्याने देण्याचा करार खालील नमुद अटी व शर्ती नुसार केलेला आहे.

१. प्रस्तुत शेतकरी उत्पादक कंपनी हे आम्ही शेतकऱ्यांचेच संघटन असून Registrar Of Companies यांचे मार्फत नोंदणीकृत असून नोंदणी क्र. CIN No - U011000MH2020PTC352786 दिनांक ३० डिसेंबर २०२० असे आहे. संस्थेचे मुख्य नोंदणीकृत कार्यालय पत्ता द्वारा – राजेंद्र दादाजी खोब्रागडे, रा.पो. शिवणी बु. ता. अरमोरी जि. गडचिरोली पिन कोड नं. ४४१२०८ आहे.

अ म र
९६४१३१२०
२०२२

दुय्यम निबंधक श्रेणी-१ यांचे कार्यालय आरमोरी

२. नमूद शेतकरी उत्पादक कंपनी ही कृषी व कृषी संलग्न व्यवसाय मध्ये निविष्ठा पुरवठ्यापासून तर कृषी व कृषी संलग्न उत्पादन, शेतमाल खरेदी, प्रक्रिया व विपणन मध्ये कार्यरत असून. कंपनी ने मुख्य उद्देश शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करून त्यांचे निव्वळ आर्थिक उत्पन्न वाढविणे आहे.

३. मी स्वत: प्रस्तुत शेतकरी उत्पादक कंपनी चे नोंदणीकृत सभासद सदस्य असून, संस्थेच्या दिनांक ०१/१२/२०२१ च्या मासिक बैठकी नुसार उपरोक्त मुद्दा क्रमांक ०२ नुसार कृषि पूरक प्रयोजन करिता माझ्या मालकीच्या शेतजमिनीचा प्रस्ताव भाडे पत्रक करिता ठेवण्यात आला. त्यास सविस्तर चर्चेअंती माझ्यासह सर्व संमतीने प्रस्ताव मान्य करण्यात आला.

४. भाडेकरार नुसार ठरविलेली रक्कम व कालावधी मला मान्य असून, मी पूर्णत: समाधानी आहे. सदर शेतजमिनीचा वापर तुम्ही पुढील २९ वर्षे करावे तसेच शेतकरी उत्पादक कंपनी करीता अटी व शर्ती नुसार शासकीय योजना व इतर प्रकल्पाच्या अंतर्गत कृषी व कृषी संलग्न उत्पादन, शेतमाल खरेदी, प्रक्रिया व विपणन व साठवणूक आदि करीता आवश्यक बांधकाम अथवा यंत्र उभारणी करीता जी काही आवश्यक मदत, कायदेशीर सहकार्य लागेल त्यास मी संपूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे.

५. सदर शेतजमिनीचा वापर आजपासून पुढील २९ वर्षे कालावधी करिता ग्रीनगोंडवाना शेतकरी उत्पादक कंपनी लिमी. शिवणी बु, ता. आरमोरी जिल्हा. गडचिरोली यांना करारावर देत आहे.

६. प्रस्तुत शेतजमिनीचा भाडेपट्टा करारनामा नुसार दरवर्षी आकारलेले भाडे रीतसर पावती भारौन अदा करावी.

७. प्रस्तुत भाडेपट्ट्यवरील शेतजमीनीवरील कृषि आधारित वा अन्य उपक्रम करिता आवश्यक कायदेशीर परवाने जसे, बांधकाम बाबत स्थानिक प्रशासनाचे नाहरकत, प्रदूषण नियंत्रण परवाना, कृषि व कृषि संलग्न उत्पादन खरेदी विक्री, विद्युत जोडणी, यंत्र उभारणी करिता परवाने घेऊन करावे व माझी त्यास कोणतीही हरकत नाही.

८. प्रस्तुत भाडेपत्रकातील शेतजमीनीवर स्फोटक व मादक पदार्थ व्यवसाय, निर्मिती व विक्री किंवा इतर बेकायदेशीर व्यवसाय करता येणार नाही.

९. नमूद भाडेपत्रकातील शेतजमीनिवर प्रस्तुत शेतकरी उत्पादक कंपनी व्यतिरिक्त इतर कोणासही भाड्याने अथवा पोत भाडेकरू म्हणून ठेवता येणार नाही.

१०. प्रस्तुत भाडेपत्रकातील शेतजमीनीचे भाडे करारनामा होतांना दोन्ही पक्षाच्या संमतीने दरवर्षी मूळ भाड्यावर वार्षिक ५ टक्के प्रमाणे वाढ करण्यात येईल.

(प्रत) 139

करिता हा नोंदणीकृत भाडेपट्टा करारनामा मी सांगितल्या प्रमाणे लिहिला असून तो मला वाचून दाखविला असून योग्य आहे. वर अटी व शर्तीच्या अधिन राहून, कुठलाही दबावाखाली न येता आमचे स्वमताने व चांगल्या मनस्थितीत असतांना खालील साक्षदारांसमोर सदर्हु भाडेपट्ट्याचा लेख लिहुन दिला. तो बरोबर असुन मला व माझे सर्व वारसदार यांना लागु व बंधनकारक असे. फ.ता. १०/०२/२०२२

**बकलम - चंद्रभान मेश्राम अर्जनविस आरमोरी** लायसन्स क्र. एम.आर.सी. ८१/२/८२ – ८३




भाडेपट्टा लिहुन घेणार :– ग्रीनगोंडवाना शेतकरी उत्पादक कंपनी लिमी. शिवणी बु.
तर्फे अधिकृत संचालक, प्रशांत नामदेव दर्वे

Authorised Director
Greengondwana Farmer Producer Co.Ltd.
Shioni(Bk.)Ta. Armori,Dist. Gadchiroli
(MH)441208
Reg. CIN No. U01100MH2020PTC352786



भाडेपट्टा लिहुन देणार :– राजेंद्र दादाजी खोब्रागडे



साक्षदार :– १) श्रीराम रामदास सपाटे वय ६१ वर्षे धंदा शेती
रा.पो.ता. आरमोरी जि. गडचिरोली
मो.नं. ९८२३२२९६१५ पिन कोड नं. ४४२१०८
आधार क्र. ६०७७ २३०९ ७१५९



२) कोविद भजनराव मडकाम वय ३० वर्षे धंदा शेती
रा.पो. नवेगांव कॉम्प्लेक्स, गडचिरोली ता.जि. गडचिरोली
मो.नं. ८६६८७५८६८५ पिन कोड नं. ४४१२०८
आधार क्र. ७९७९ ०५९९ ३३५५

अ म र
१५४/७/२०
२०२२

दुय्यम निबंधक श्रेणी-१ यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
आरमोरी